कामाचा आदेश

पत्र क्र.जिपव/जिजअ/लपा/लेखा/वशि-565/2024
कार्यालय जि.प.लघुपाटबंधारे विभाग,वर्धा
दिनांक :- 21.08.2024

प्रति,

**शिवशक्ती कंस्ट्रक्शन,वर्धा**

**विषय :- गांव तलाव इंदरमारी दुरुस्ती ता.आष्टी जिल्हा वर्धा येथिल काम**

**करारनामा क्रमांक :- ब-1/जिवायो/गां.त / 14/2024 दिनांक 21/8/2024**

उपरोक्त विषयान्वये आपणांस **परिशिष्ठ "ब" चे रुपये 1582220/- चे दरापेक्षा 22.67 % कमी दराने रुपये 1223531/-** एवढया किंमतीचे काम मंजुर करण्यात आलेले आहे. करारनाम्याच्या अटीप्रमाणे **1% अनामत रक्कम रुपये 15900/-** ऑनलाईनद्वारे जमा करण्यात आलेली आहे. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग झेडपीऐ-2009/प्र.क्र.514/वित्त-9 मुंबई दिनांक 20/11/2009 अन्वये **रुपये 1000/- किंमतीचे स्टॅम्प** पेपरवर संबंधित कंत्राटदारांने स्वाक्षरीनिशी करारनामा करुन दिलेला असल्यामुळे आपणांस काम सुरु करण्याचे आदेश देण्यात येत आहे. ह्या कामांची मुदत आदेशाच्या दिनांकापासुन 31 मार्च 2025 पर्यंत राहील इतर अटी करारनामा ब-1 प्रमाणे बंधनकारक राहील. निविदा क्लॉज 54 चा फायदा देय राहणार नाही.

1. काम सुरु असतांना नैसर्गिक आपत्ती आली तर कामावरील कोणत्याही साहित्याच्या नुकसानीची भरपाई विभागामार्फत दिल्या जाणार नाही.
2. काम सुरु होवुन पुर्ण होण्यापुर्वी नैसर्गिक आपत्तीमुळे कामाचे नुकसान झाल्यास संपुर्ण दुरुस्ती आपणांस आपल्या स्वत:च्या खर्चांनी करुन द्यावी लागेल.
3. मुल्य वृध्दीचे कलम लागु राहणार नाही.
4. प्रस्तावित कंत्राटी कामाचा व सदर काम पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांच्या विमा शासकिय विमा निधीकडे किंवा शासकिय विमा निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविण्याशिवाय कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान केल्या जाणार नाही.
5. कामावर करण्यात येणाऱ्या गौण खनिजांचे रॉयल्टी क्लिअरन्स प्रमाणपत्र संबंधीताकडुन प्राप्त झाल्याशिवाय देयके मंजुर केल्या जाणार नाही किंवा देयकामधुन रॉयल्टीची रक्कम वसुल करण्यात येईल.
6. निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाचे शोधन करण्यात येईल. इतर अटी करारनामा "ब" प्रमाणे बंधनकारक राहील.
7. कामगार कल्याण उपकर 1% देयकामधुन वसुल करण्यात येईल.
8. काम सुरु करण्यापुर्वी कामाच्या स्थळाचे तसेच काम सुरु असतांना व बिलाचे तारखेपर्यंत झालेल्या कामाचे फोटो देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे.
9. कामाचा आदेश मिळाल्यापासुन 15 दिवसाचे आत काम सुरु करावे. काम सुरु न केल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करुन काम रद्द करण्यात येईल.
10. सदर कामाच्या परिशिष्ट ब पेक्षा 22.67 % कमी दराने मंजूर करण्यात येत असलेल्या मुल्यापेक्षा जास्त रकमेचे काम करता येणार नाही तसेच सदर कामास प्रशासकिय मान्यता देणारे सक्षम प्राधिकारी यांच्या लेखी मान्यतेशिवाय कामाचे परिमाणात वाढ करता येणार नाही
11. परिशिष्ट ब पेक्षा कमी दराचे काम घेऊन कामाचे मुल्यांकनामध्ये वाढ करण्याच्या हेतुने स्थानिक परिस्थिती उद्भवल्याचे कारण दर्शवून हेतूपुरस्पर कामाचे लांबी -रुंदी व खोली इत्यादीमध्ये कोणत्याही परिस्थितीत वाढ करता येणार नाही.

A Gadse

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**जि.प.लघुपाटबंधारे विभाग,वर्धा.**

प्रतिलीपी :-

**1.जिल्हा जलसंधारण अधिकारी,लघुपाटबंधारे ,विभाग जि.प.वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता अग्रेषित**

**2.उपविभागीय जलसंधारण अधिकारी,जि.प.लघुपाटबंधारे,उपविभाग आर्वी, जिल्हा वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित. सदर कामाचा विमा संबंधित कंत्राटदारकडुन काढण्यात आल्याबाबत सहानिशा करुन काम सुरु करावे.**

A Gadse

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**जि.प.लघुपाटबंधारे विभाग,वर्धा.**

O/C